**।। ॐ श्री साईराम ।।**

**'साई पर्ल्स ऑफ व्हिजडम'**

**साई ज्ञानमौक्तिके**

भगवान साईबाबांच्या चरणकमलांना वंदन

भाग १४ ड

## –ना फायदा ना तोटा –

मधल्या वेळात बाबांनी जमलेल्या एका भक्ताला बोलावून घेतलं.

''इकडे ये. हंऽऽ! तू येथे काय करतोस?''

तो म्हणाला, ''स्वामी, मी येथे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये कॅन्टिन चालवतो.''

''हंऽऽ! छान.''

मग भगवान प्रेमळपणे मृदु आवाजात म्हणाले, ''हे बघ, इथल्या होस्टेल आणि कॅन्टिनमध्ये ज्या दर्जाचे पदार्थ बनवले जातात, तसेच चांगले पदार्थ तू बनवले पाहिजेत. पदार्थ फक्त चवदारच बनवले पाहिजेत असं नाह, तर ते भरपूर प्रमाणात असले पाहिजेत. तर तू जे पदार्थ येथे देशील ते गुणवत्तेने उत्तम आणि भरपूरही असले पाहिजेत. आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे, त्यांची किंमत फार जास्त ठेवू नकोस. किंमती कमी ठेव. इथे येणारे पुष्कळसे भक्त जास्त खर्च करू शकत नाहीत, तेव्हा तू पदार्थ स्वस्त ठेवायला हवेत. 'ना फायदा, ना तोटा' ह्या तत्त्वाप्रमाणे असायला हवेत कारण आपण इथे धंदा चालवत नाही.'' भगवान जे म्हणाले ते असं होतं. त्या माणसाबरोबर बोलत असताना, त्यांनी माझ्याकडे पाहिलं. (हशा)

## 'मला त्यांची काळजी घेतली पाहिजे.'

नंतर ते म्हणाले, ''इकडे पाहा, ह्या सर्व गोष्टींची मीच स्वत: काळजी घेतली पाहिजे. कॅन्टिनमध्ये काय चाललंय याची मला चौकशी करायला हवी. कॉलेजमध्ये काय चाललंय, स्टोअर्समध्ये काय घडत आहे. हॉस्पिटलमध्ये काय घडत आहे या सगळ्यांवर माझं लक्ष असतं. हे तुला माहीत आहे का? मला त्यांची काळजी घेतली पाहिजे. मला त्यांची व्यक्तिश: काळजी घेतली पाहिजे. बाबा म्हणजे काय आहेत, 'हे असे आहेत' – स्वामींनी हे स्पष्ट करून सांगितलं.

प्रामाणिकपणे बोलायचं तर हे सर्व ऐकल्यावर मला त्यांची कीव आली. (हशा) कारण त्यांच्या मदतीला कुणीही नसतं. त्यांना खूप धावपळ करावी लागते.

## 'आनंदाकडे नेणाऱ्या पायऱ्या?''

आणि अचानकपणे त्यांनी माझ्या हातात असलेल्या पुस्तकाकडे पाहिलं. या पुस्तकाचं शीर्षक, 'सुखाकडे नेणारे मार्ग' असं होतं. त्यांनी ते पुस्तक मागितलं. ''बरं, हे काय आहे? एखादी कादंबरी किंवा ललित साहित्य आहे?''

मी, सारं बळ एकवटून, ते पुस्तक त्यांच्या हाती दिलं. स्वामींनी पुस्तक घेतलं आणि त्याचं शीर्षक वाचलं.

'सुखाकडे नेणारे मार्ग?'' (हशा)

''होय, स्वामी.''

तेव्हा ते म्हणाले, ''अशा तऱ्हेचे सुखाकडे नेणारे मार्ग असतात का?''

मी काय बोलणार?

''स्वामी, मला अजून ते पुस्तक वाचायचं आहे. ते वाचल्यावरच मी सांगू शकेन.'' (हशा)

मग बाबा म्हणाले, ''सुखाकडे नेणारे असे मार्ग नसतात. सुख हा एकच मार्ग. इतकंच, त्यासाठी दुसरे मार्ग नसतात.''

''ओह्! फक्त एकच? तो कोणता?''

''देवाशी एकरूपता हेच सुख, आनंद असतो. परमेश्वराशी एकरूप होणं हेच ते सुख. सुखासाठी मार्ग वेगळे नसतात.''

असं म्हणून स्वामी त्या दिवशी तेथून निघाले.

## जुलै २००१

आता मी जुलै २००१ मध्ये घडलेल्या घटनेकडे वळतो.

## 'सेवेची व्याख्या'

हे एक अधिवेशनातील उत्सुकतापूर्ण असं सत्र होतं. मला असं म्हणायचं नाही की यापूर्वीची सत्रे उत्कंठापूर्वक नव्हती. (हशा) एकापेक्षा दुसरं जास्त उत्कंठापूर्ण असत. ही उत्कंठा जास्त, जास्त खोलवर वाढत असते. जसं आपण एका सत्राकडे वळतो, त्याप्रमाणे उत्कंठा वाढत जाते.

दैवी संवाद हे गोडच असतात. तसंच ते मौलिकही असतात. आमचे येथील मित्र, जे ही दैवी संभाषणे जगभरातील भक्तांना उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करीत आहेत, त्यांची ही सेवा उच्च आणि खूप मोठी सेवा आहे. हे मी तुम्हाला अगदी अंत:करणापासून सांगतो. मी एकटा हे काम करू शकत नाही, यात मुळीच शंका नाही.

बाबांनी 'सेवा' ह्या शब्दाची व्याख्या सांगितली आहे. तुम्हा सर्वांना ती समजावी असं मला वाटतं, कारण तुम्ही करत असलेल्या सेवेची कल्पना तुम्हाला नीट समजली नसावी, म्हणून मला तुम्हाला ते सांगायचं आहे. तुम्हाला आतापर्यंत समजलं असेल की मी तुमच्याकडून कोणत्याही प्रकारची स्तुतीची अपेक्षा करत नाही. त्यांची असीम कृपा आणि दया मला मिळाली तरी ते पुरे आहे. जर ते दर दिवशी असेच बोलत राहतील तरी ते पुरेसे आहे. मी हे संदेश तुमच्यापर्यंत पोचवत राहिलो तरी ते पुरे आहे. माझी सर्वांत आवडती गोष्ट हीच आहे. दुसरं काहीच नाही.

'सेवा' ह्या शब्दाविषयी बाबा काय म्हणाले? 'सेवेची' व्याख्या – एखाद्या व्यक्तीला परमेश्वराजवळ नेण्यासाठी तुम्ही जे जे प्रयत्न कराल ती सेवाच असते. कॅण्टीनमध्ये किंवा स्टोअर्समधील कामे हीसुद्धा सेवाच असतात यात शंका नाही. एखाद्याला किंवा प्रत्येक भक्ताला देवाच्या अधिक जवळ नेण्यासाठी त्यांच्यापर्यंत साईंचा संदेश पोचवणे ही सर्वांत श्रेष्ठ सेवा असते. आपल्याला आयुष्यात आणखी काय पाहिजे असते? स्वामींनी ही संधी आपल्याला दिल्याबद्दल स्वामींचे आभार मानू या.

## 'कर्माचे प्रकार'

उरलेल्या वेळात मी तुमच्याशी कर्मावर बोलू शकतो. कर्म=कृती.

संध्याकाळी भगवान आमच्याशी 'कर्म' या विषयावर बोलले. 'कर्म म्हणजे कृती' हे तुमच्यापैकी सर्वांना माहीत आहे. त्यांनी वेगवेगळ्या प्रकारच्या कर्मांचा, वेगवेगळ्या कृतींचा संदर्भ दिला आणि त्यांनी हा मुद्दा केंद्रस्थानी ठेवून, विशिष्ट दिशेने मधून मधून मोकळेपणाने आणि समंजसपणे प्रश्न विचारण्याची मला परवानगी

दिली.

जेव्हा स्वामी कर्माविषयी बोलत असतात, तेव्हा मी 'भक्ती किंवा श्रद्धा' यावर प्रश्न विचारू नयेत. ते चुकीचे होईल. मी असे बोलूच नये की, 'स्वामी, तुम्ही तुमच्या बालपणाच्या दिवसांबद्दल बोला, कारण ते विषयाला धरून होणार नाही. म्हणून भगवानांनी सुरू केलेल्या चर्चेवर तोच विचारप्रवाह चालू ठेवावा हे योग्य होईल. तर त्या संध्याकाळी त्यांनी 'कर्मावर' बोलायचे ठरवले.

ओह्! ते भाषण इतके सुंदर, सुरेख होते. ज्या मुद्याने मी आज सुरू करेन तो पहिला मुद्दा, कदाचित तो परदेशी लोकांना नवीन असेल. का? कारण ही कल्पना दुसऱ्या कुठल्याही धर्मात अस्तित्वात नाही.

'कर्म' तीन प्रकारचे असते. कर्माचा दुसराही एक अर्थ आहे : १) कृतीचे फळ, २) कृतीचे परिणाम, ३) कृतीचे बक्षीस

हे असेही कर्म या शब्दाचे अर्थ आहेत. स्वामींनी त्यांची तीन नावे सांगितली आहेत.

१) प्रारब्ध - प्रारब्ध कर्माचा अर्थ असा की पूर्व जन्मातील कर्माचे परिणाम. पूर्व जीवनातील कृतींचे परिणाम. माझं म्हणणं समजलं का?

२) वर्तमानकाळातील किंवा चालू जीवनातील कृतींचा परिणाम. ह्याला 'संचित' असे म्हणतात.

३) पुढील, भावी जीवनातील कृतींचे परिणाम, त्याला 'आगामी' असे म्हणतात.

म्हणजे कृतींचे होणारे परिणाम आपल्याला तीन भागांमध्ये भोगावे लागतात- भूतकाल, वर्तमानकाल आणि भविष्यकाल.

भूतकाळाचे परिणाम म्हणजे प्रारब्ध, वर्तमानाचे परिणाम म्हणजे संचित आणि भविष्यातील परिणाम म्हणजे आगामी.

असे भगवानांनी सांगितले.

## 'तुमच्या कृतींच्या परिणामातून तुमची सुटका नाही.''

''स्वामी, या तीनमध्ये काय फरक आहे? भूत, वर्तमान व भविष्य कालातील आमच्या कृतींचे परिणाम - हे कसे असतील, त्यामुळे काय होईल? ते कृपा करून त्या तीनही मधला फरक आम्हाला सांगाल का?''

मग बाबा म्हणाले, ''ते भूत, वर्तमान किंवा भविष्य कालातील असोत, तुमच्या त्या कृतींच्या परिणामांपासून तुमची सुटका नसते चांगल्यया कर्मांची फळे चांगली असतील, वाईट कर्मे वाईट परिणामांना शरण जातील. तुमच्या कर्मांच्या फळांपासून तुमची सुटका नाही.''

बंधु भगिनींनो,

आपण जेव्हा कृती करतो, तेव्हा ह्याची कल्पना असली पाहिजे. आपण आनंदाने काही काम करू, पण त्याचा परिणाम मात्र डोळ्यांत आसवं, अश्रु आणेल- पण तोपर्यंत खूप उशीर झाला असेल. आपण चांगलं वागू या, म्हणजे मग त्याचा परिणामही तितकाच चांगला असेल. हा धोक्याचा इशारा नसला तरी ही एक सूचना आहे.

भगवानांनी एक उदाहरण दिलं. ''एक आगगाडी आहे. त्याला तीन प्रकारचे डबे असतात. प्रथम वर्ग, द्वितीय वर्ग आणि तृतीय वर्ग. गाडी पुढे पुढे धावते आणि फलाटापर्यंत पोचते. तीनही वर्गाचे डबे फलाटापर्यंत पोचतात. फक्त पहिलाच, किंवा दुसरा वर्गाचा डबा पोचतो, किंवा तिसऱ्या वर्गाचा डबाच पोचतो असे नाही तर तीनही वर्गाचे डबे फलाटावर पोचतात. त्याचप्रमाणे तीनही कालातील कर्मांचे परिणाम तुमच्या समोर येतात. त्या परिणामांना स्वीकारा. आव्हाने स्वीकारा. चांगल्याचे चांगले, वाईटाचे वाईट. कसा का असेना, परिणाम

स्वीकारा.’’ असे भगवानांनी सांगितले.

आता तिसऱ्या शेवटच्या मुद्यानंतर मी हे अधिवेशन संपवतो

‘‘स्वामी, आपण अनेक वाईट व्यक्तींची भरभराट होत असताना पाहतो. (हशा) ते परिणामांना तोंड देत नसतात का? उदाहरणार्थ, माझ्यासारखा मााणूस किती अडचणींना सामोरे जात असतो, त्याच वेळेस, दुसऱ्या माणसाला काहीच प्रश्न नसतात. तो एक नंबरचा गुंड असतो. (हशा) पण त्याची मात्र भरभराट होत असते. मला मात्र असा अनुभव घेता येत नाही. का? असं का व्हावं?

बाबा म्हणाले, असं घडू शकतं, दिसतं. अनिपिंचू- ते तसे दिसत असेल, पण त्या कृतींचे परिणाम - थिनी पिंचू - तुम्हाला भोगावेच लागतील. कोणत्याही अटींशिवाय! असे भासेल की तो त्यातून सुटला, पण नि:संशयपणे त्याच्या कृत्यांचे परिणाम भोगावेच लागतील.’’ असं भगवान म्हणाले.

***